Volume 4 | Issue 5 | Nov 2014

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-5 | Nov-2014
Available online at www.aygrt.isrj.org

# चीन ची आक्रमक मनोवृत्ती आणि भारतीय सुरक्षा चिंता

एन.झेड्. पाटील

विभाग प्रमुख व रिसर्च गाईड , के. एन. बी .आर्टस कॉलेज नवलनगर ता.जि.धुळे.

*सारांश* **:-** भारत आणि चीन आशिया खंडातील अशा दोन अण्विक , सामरिक ,आर्थिक शक्ति आहेत. त्यांच्या परस्पर सहकार्य किंवा संघर्षामुळे केवळ आशियाच नाही तर संपूर्ण जगाचे शक्ति संतुलन प्रभावित होते. प्राचिन सभ्यतांचे वाहक तसेच पोषक असलेल्या या दोन्ही देशामध्ये प्राचिन काळापासून राजनैतिक संबंध नसतांना देखिल सांस्कृतिक संबंधाचा आधार मजबूत राहिलेला आहे. हिमालायीन पर्वत श्रृंखलांना जवळ असलेल्या भारत व चीन यांच्यात प्राचिन काळापासून आर्थिक तसेच सांस्कृतिक सबंधा बाबतचे प्रमाण प्राप्त होतात.

***प्रस्तावनाः–***

'भारतीय महाकाव्य महाभारतात (इ. पू.5) मध्ये चीन शब्दाचा उल्लेख आढळतो त्याचा आर्य क्विन राज्य (Qin Dynasty) ने लावला जाउु शकतो. आचार्य कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र ग्रंथात महाचीन व सिनापट्ट (बिपदंचजजं) तसेच सिनामसुख नावाने उल्लेख आहे या गोष्टी अशी पुट्टी करतात की, मौर्य शासन काळात भारत व चीन यांच्यात सिल्क चा व्यापार सुरू होता. एवढेच नाही तर पहिल्या व दुस–या इ.स. पूर्वी भारत व चीन च्या हान राजवंशा मध्ये दूतांमार्फत संबंध स्थापित झाल्याचे प्रमाण प्राप्त होतात. अशा प्रकारे चीनचा विद्वान बान गू (Ban-gu) याच्या एका दूताने भारताच्या कांजीवरम यात्रेचे वर्णन केले आहे. एवढेच नाही तर 1926 मध्ये भारतीय नेत्यांनी चीन वरील ब्रिटिश साम्राज्याचा व्रीव विरोध केला होता.

15, ऑगस्ट ,1947 मध्ये ब्रिटिश गुलामगिरीतून मुक्ती नंतर ऑक्टोबर 1941 मध्ये भारताने चीन मध्ये माओच्या नेतृत्वात स्थापन झालेल्या साम्यवादी सरकाराला 30 डिसेंबर 1949 रोजी मान्यता दिली या संदर्भात 17 मार्च 1950 रोजी संसदेत बोलतांना नेहरूनी म्हटले की, '' चीन च्या नव्या साम्यवादी सत्तेची स्थापना इतिहासाची एक अशी महत्वपूर्ण घटना आहे की ही सत्ता स्थिर राहिल तसेच तिला कोणीही हटवू शकणार नाही '' नेहरूंनी चीन संदर्भात भारताच्या परराष्ट्र धोरणा विषयी ज`मत निश्चित केले होते किंवा भारताचे चीन बरोबर धोरण कसे असेल ते स्पष्ट करतांना त्यात पुढील मुद्यांवर जोर दिला होता.

1) चीन बरोबर मैत्रीपूर्ण निर्मिती करणे.
2) एक दुस–यांच्या विकास कार्यात एकमेकांना सहकार्य करणे.
3) आशियात शांत व स्थिरतेला प्रोत्साहन तसेच शीत युध्दांच्या विस्तारावर नियंत्रण ठेवणे.
4) आशियाई क्षेत्राला महाशक्तींचे स्पर्धा स्थळ बनण्यापासून रोखणे.

वरील धोरणाच्या संदर्भात चीन ने सकारात्मक दृष्टिकोण दाखवला त्याच बरोबर '' हिन्दी–चिनी भाई–भाई चा सुखद नारा दिला परंतु माओ ने चीनच्या भू–सामायिक ,राजनैतिक तसेच आंतरराष्ट्रीय हितांचे संचालन व वाढीच्या संदर्भात भारता कडे सदैव संशयाने पाहून भारताला धोक्यात ठेवले. जरी माओने कोरिया युध्दात भारतीय धोरणाची प्रशंसा केली तरी चीन ने भारत व भारतीयाबद्दल अविश्वास व घृणेची भावना न लवपता नेहरूंना ''Half Man Half Devil'' ची संज्ञा दिली. भारतीय राजनयाचे हे दुभाग्य होते की , चीनी धोरणची

वास्तविकता व त्याचा अंदाज घेण्यात भारत अयशस्वी राहिला. एवढेच नाही तर संयुक्त राष्ट्र संघात चीनच्या प्रवेशाचे समर्थन केले. फेब्रवारी 1951 मध्ये युनो ने कोरिया संदर्भात चीनला आक्रमक ठरविण्यासाठी जो ठराव मांडला त्यात भारताने प्रस्तावाच्या विरोधात मतदान केले. एवढेच नाही तर सप्टेंबर 1951 मध्ये जपान ने सॅनफ्रान्सीस्को येथे जे संमेलन आयोजित केले त्यावर चीन ने बहिष्कार टाकला म्हणून भारताने देखिल त्या संमेलनात भाग घेतला नाही. पाश्चिमात्य शक्तिंनी भारताला युनोच्या सुरक्षा परिषदेचा सदस्य करण्याचा प्रस्ताव दिला परंतु प.नेहरू आपल्या आदर्शवादात अडल्याने तो प्रस्ताव त्यांनी नाकारला एवढेच नाही तर त्यांनी चीन च्या समावेशाचा प्रस्ताव मांडला. पं. नेहरूंनी आपल्या शांततापूर्ण सहअस्तित्वाच्या धोरणाला अधिक महत्व दिले आणि ते चीन च्या वास्तविक धोरणाला समजण्यात अपयशी ठरलेत त्याचे परिणाम स्वरूप तिबेट समस्या आज भारत–चीन यांच्यातील संघर्ष व तनावाचे कारण बनली आहे.

### *तिबेट समस्या –*

जवळ–जवळ 12,24,400 वर्ग किमी विस्तृत '' आशिया चे छत्र'' च्या नावाने प्रसिध्द तिबेंटच्या पूर्वेला चीनचा यूनान तसेच दक्षिणेस भारत, नेपाळ ,भूतान व म्यानमार ने वेढले गेले आहे. भारत–चीन यांच्यात अंतस्य राज्य (Buffer state) च्या रूपात स्थित हे क्षेत्र संचार माध्यमांनी संपूर्ण जगाशी जुळले आहे. तेथे मोठया प्रमाणात खनिज भांडार देखिल आहे. माउुंट एव्हरेस्ट तेथेच स्थित आहे. इतिहास काळात इ.625 मध्ये पहिल्यांदा तिबेटचे ऐतिहासिक पुरावे मिळतात तसेच ई.173 मध्ये बौध्द धर्माचा तिबेट मध्ये विस्तार झाल्याने ई.617 मध्ये तिबेटी यात्री ''युध्दात तिबेट विजयी झाला तसेच एका लिखित करारा नुसार चीन व तिबेटच्या सीमा निश्चित केल्या गेल्यात. जरी 1249–1368 पर्यत तिवेट वर मंगोलांचे शासन राहिले तरी तिवेटची धर्म संस्कृती अबाधित राहीली होती. 1907 मध्ये संपन्न इंग्रज व रूसच्या समझोत्यानुसार पहिल्यांदा तिबेट वर ची नचे अधिराज्य स्वीकार केले गेले.

ऑक्टोबर 1913 व जुलै 1914 मध्ये आयोजित शिमला कन्व्हेक्शन मध्ये तिबेटचा प्रतिनिधी लान्चेन राजा, चीनी प्रतिनीधी चन–आई–फन व ब्रिटिश–भारताचा प्रतिनिधी सर हेन्री मॅकमोहन यांनी चीन–तिबेट संबंध व भारत–तिवेट सीमा मूद्यावर गहन विचार विमर्श केला. या वेशी संपन्न समझोत्यानुसार तिबेट वर चीनी अधिपत्य मान्य केले गेले तसेच तिबेटचे त्वॉग क्षेत्र , लोहित , अपरलिंग तसेच सियान क्षेत्राला भारतात जोडून सीमीचे निर्धारण तर केले गेले परंतू चीन ने मॅकमोहन सीमा रेषेला मान्य केले नाही.

तिबेट वर अधिकार प्रस्थापित करण्या संबंधी चीनची राजनैतिक , सामरिक हालचालींच्या संदर्भात आपली तिबेट संबधी नीती स्पष्ट करतांना पं.नेहरूंनी सन 1949 मध्ये लंडन मध्ये आयोजित एका वार्ताहर सम्मेलनात म्हटले की,''भारताने तिबेटवर चीनचे अधिराज्य मान्य तर केले आहे ,परंतु ते एक स्वायत्त शाशित क्षेत्र आहे तसेच त्यांच्या बरोबर त्याच आधारावर व्यवहार केला गेला पाहिजे. '' एवढेच नाही , चीनी सेना (PLA) –द्वारा तिबेटला मुक्त करण्याच्या चीनी घोषणेवर पं. नेहरूनी म्हटले की,'' शेवटी तिबेटला कोणापासून मुक्त करायचे आहे'' या ठिकाणी उल्लेखनीय आहे की , भारताचे आपले हिमालयीन–क्षितिजाच्या सुरक्षेसाठी सिक्कीम , भूनान व नेपाळ बरोबर आपल्या सुरक्षा संबंधांना सुदृढ करण्यासाठी कराराच्या माध्समातून भरपूर प्रयत्न केला , परंतु भारताची सुरक्षा  उदासिनतेमुळे तिबेट मध्ये चीन चे अतिक्रमण व आक्रमक कार्यवाहींनी भारताची उत्तर सीमेच्या सुरक्षेसंबधी आव्हाने निरंतर कठीण  होत गेलेले आहेत. तिबेट ने चीनी धोका लक्षात येउुन अमेरिका , भारत ,नेपाळ तसेच ब्रिटन मध्ये आपले शत्रूत्वपूर्ण, मानली , तसेच याचा बदला म्हणून जवळ जवळ 1 लाख चीनी सैनिकांना ल्हासा कडे पाठवून चीन ने 'चामडो ' कस्बावर नियंत्रण प्राप्त करून घेतले.

भारत सरकारने चीनच्या या आक्रमतेची निंदा केली तसेच या समस्येच्या शांतीपूर्ण सोडवणूकीचे आव्हान केले. परंतू त्याचा काहीही उपयोग झाला नाही. या समस्येच्या  समाधानासाठी तिबेट व चीन यांच्यात 23 मे 1951 मध्ये एक 17 सुत्रीय समझोता झाला. परंतू चीन ने पुन्हा आपली भूमिका बदलली आणि ऑगस्ट 1952 मध्ये तिबेटला आश्चर्यचकीत करत सिक्यॅग क्षेत्रा कडून आक्रमण केले. या संघर्षाच्या वेळी चीन भारताला असे आश्वासन देत राहिला की , दोन्ही देशांमध्ये कोणताही क्षेत्रा कडून आक्रमण केले. या संघर्षाच्या वेळी चीन भारताला असे आश्वासन देत राहिला की, दोन्ही देशांमध्ये कोणताही क्षेत्रीय विवाद नाही.

डिसेंबर 1553 मध्ये भारताच्या आवाहनाला सात देत भारत–चीन  यांच्यात चर्चा सुरू झाली तसेच 21 एप्रिल 1954 मध्ये दोन्ही देशांमध्ये तिवेट मध्ये यात्रा , व्यापार आणि सांस्कृतिक संबधाना प्रोत्साहनासाठी ''पंचशील करारा' वर स्वाक्षरी झाली. त्या नुसार भारताने चीन च्या तिबेट वरील अधिकार मान्य केला. तिबेट संदर्भात पं. नेहरूंचा असा बदलेला दृष्टिकोन विस्मयकारी तसेच रहस्यमयी होता त्यामुळे तिबेटच्या स्वातंत्र्य अभियानांचीच हत्या नेहरूंनी केली होती. तिबेट संबंधी भारताच्या या मुर्खतापूर्ण दृष्टिकोणाने भारत–चीन युध्दाचाच मार्ग नेहरूंनी प्रशस्त केली होता. त्यामुळे भारताचे पंचशील , बांण्डुग परिषद तसेच अलिप्ततेची नीती पूर्णपणे ध्वस्त झाली होती.

जरी हे सत्य होते की, काश्मिर संघर्षाला तोंड देणारा भारत आपली कमजोर सामरिक क्षमता ,

भू–राजनैतिक स्थिती व सैनिकी कारणांमुळे चीन सारख्या शेजा–यांशी कोणत्याही प्रकारच्या सशस्त्र संघर्षाच्या स्थितीत नव्हता तरी तिबेट संदर्भातला भारताचा पलायनवादी व आदर्शवादी दृष्टिकोण कोणत्याही स्थितीत उचित मानला जाउु शकत नाही.

*उपरोक्त संदर्भात खालील काही बिंदू विशेषत्वाने उल्लेखनीय आहेत.–*

1) सन 1950 मध्ये पं. नेहरूंनी आधी तिबेटवर चीन चे अधिराज्याला स्विकार करणे नंतर अचानक तिबेटचे आंतराष्ट्रीय स्थान डोळयाआड करून त्याला 'ची नचे तिवेट क्षेत्र' (Tibet region of chin) मानून त्यावर चीनचा अधिकार मान्य करणे विस्मयकारी आहे. उल्लेखनीय आहे की , ब्रिटिश सरकारने रशियाला नियंत्रीत करण्यासाठी तिबेटला एक स्वतंत्र राज्याचा दर्जा देत म्हटले होते की , 1950 च्या आधीच्या चाळीस वर्षात येथे कोणत्याही बाहय् शक्तिच्या हस्तक्षेपाचे पुरावे मिळत नाहीत.

2) पूर्व विदेश सचिव एस दत्ता यांनी रहस्योद्घाटन केले की , स. न. 1954 मध्ये झालेल्या भारत–चीन कराराच्या वेळी मॅकमोहन रेषेची वैधानिक स्थिती अविस्कार करण्यासंबधी चीनी दृष्टीकोणला पुढे नमवण्यासाठी पं. नेहरूंच्या विचारधारेवर सुध्दा के.एम . पन्नींकरांच्या दृष्टीकोन निर्णायक सिध्द झाला. या महत्वपूर्ण वेळी मॅकमोहन रेषा विवाद सोडण्यासाठी असलेला कुटनितीक सुअवसर भारताच्या हातून निघून गेला.

3) आपल्या हिमालयीन क्षेत्राच्या उदासिन भारताने जरी तिबेटच्या संदर्भात राजनैतिक व सामरिक दृष्टया आक्रमक व कडक भूमिकेतून विरोध दर्शविला असता तर '' कोरिया युध्द '' व आपल्या अंतर्गत समस्यांना झुंझ देणारा चीनने तिबेट मध्ये सैन्य अभियान राववतांना अनेकदा विचार केला असता. परंतू भारताची सुध्दा उदासिनता व अदूरदर्शी राजनयाचा चीनने पुरेपुर फायदा घेतला.

4) वरील मुर्खतापूर्ण निर्णयांवर पुढची कडी म्हणजे 1950 मध्ये तिबेटवरील चीनी सैन्य अभियांना विरूध्द संयुक्त राष्ट्र महासभेत जो निंदा प्रस्ताव आणला गेला त्यावर भारताने प्रस्तावाच्या विरोधात जाउुन असे म्हटले की, चीनने या समस्येच्या शांतिपूर्ण समाधानाचे भारताला आश्वासन दिले आहे.

5) पं. नेहरू काश्मिर प्रश्नाने व अनुभवांनी पिडीत होते त्यांनीच दलाईलामा यांना तिबेटचा प्रश्न युनो मध्ये होउुन जाण्यापासून रोकले होते. तर हा प्रश्न युनो मध्ये गेला असता तर तत्कालीन शीतयुध्दकालीन परिस्थितीत चीनच्या विरूध्द ब्रिटिन व अमेरिका तिबेटच्या संदर्भात सकारात्मक निर्णय घेउु शकले असते.

*भारत–चीन सीमा वादाचे विविध आयाम–*

चीनकडून तिबेटवर नियंत्रण स्थापन करण्याचे फलस्वरूप 'बफर स्टेट' (Buffer State) च्या अस्तित्वाच्या समाप्ती नंतर भारत–चीन यांच्यात सीमा–संघर्षाची सुरूवात होणे स्वाभाविक होते. हिमालयाच्या नैसर्गिक अडथळयांमुळे भारत व चीन यांच्यात विभाजीत या क्षेत्रात भारत व चीन यांच्यात जवळ–जवळ 3840 कि. मी. लांब सीमा खालील तीन क्षेत्रांमध्ये विभागली गेली आहे.

***1)पश्चिम क्षेत्र–***

या क्षेत्रात भारत–चीन–अफगणिस्तान त्रिकोणावर अक्साई चीन क्षेत्र स्थित आहे. त्याच्या उत्तरेत–चीनचा सिक्यॉग प्रदेश आहे तसेच चीनला भारतीय भू–भागाच्या रूपात प्रदर्शित केले जात आहे. लडाखच्या राजवंशाचा यावर अधिकार राहिला आहे. तसेच चीन कडून या क्षेत्राला हडपण्याचा कोणताही ऐतिहासिक पुरावा देखिल उपलब्ध नाही. भू–सामरिक दृष्टीने महत्वपूर्ण येथील सीमा क्षेत्राचे निर्धारण 1842 मध्ये काश्मिरचे महाराजा, तिबेट चे दलाई लामा व चीनच्या शासका मध्ये हस्तांतरीत संधीच्या आधारावर केले गेले होते. एवढेच नाही तर 1847–48 मध्ये चीन व ब्रिटन यांच्यात संपन्न कुटनीतीक पत्र व्यवहाराने सुध्दा या सीमा रेषेला मान्यता प्रदान केले गेली आहे.

***2)मध्ये क्षेत्र–***

स्पिती घाटी तसेच शिपकला खोरे यांच्या मध्ये विस्तृत हे क्षेत्र भारताच्या नियंत्रणत राहिले आहे. सन 1882,1893,1817,1920 मध्ये ब्रिटिश अधिका–यांच्या सर्वे रिपोर्टच्या आधारावर हे क्षेत्र भारताचे अंग राहिले आहे. गढवाल क्षेत्रात गंगा–सतलज नद्या परंपरागत सीमा राहिल्या आहेत. सन 1936 मध्ये'जेल्स लाप्रोथ 'व 'जोसेफ चावने ' यांनी ही आपल्या एका सर्वे रिपोर्ट मध्ये जल विभाजक तथ्यांचा आधारावर शिपकिला भारताच्या नामिया गावाचा हिस्सा असल्याचे म्हटले गेले आहे.

***3)पूर्व क्षेत्र–***

या क्षेत्रात भारताची परंपरागत सीमा–रेषा सिक्किम पासून म्यानमारपर्यंत विस्तृत आहे. ध्यातव्य आहे की, सिक्किम बरोबर सीमा रेषेचे निर्धारण सन 1890 मध्ये तसेच नेफा (NEFA) व वर्मा बरोबर 1913–14 मध्ये संपन्न शिमला समझोत्याच्या आधारावर झाले होते. किती विडंबना आहे की, मॅकमोहन रेषेला अवैध व साम्राज्यवादी रेषा संबोधून चीन त्याला अमान्य करत आहे. तर वर्माला सलंग्र याच रेषेला चीन मान्यता देत आहे. या क्षेत्रातला भारत–चीन सीमा प्रश्न अतिशय जटील व संघर्षपूर्ण आहे.

मार्च 1939 मध्ये तिबेट मध्ये झालेला विद्रोह , ऑगस्ट महिन्यात नेफा च्या लोंग्जू तथा आक्टोबर मध्ये लडाख क्षेत्राच्या कांताला खिंडी क्षेत्रात भारत व चीन यांच्यात संपन्न सीमा –संघर्षाने स्थिती तणावपूर्ण बनली होती. नेहरू व चौ–एन–यांच्यात संपन्न वार्तांनी व पत्र व्यवहाराने कोणताही सार्थक परिणाम निघाला नाही. जेथे एकीकडे चीन ने आपल्या मानचित्रात अक्साई चीन क्षेत्र दाखवून आपली बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न केला. तर दुसरी कडे मॅकमोहन रेषेला असंवैधानिक सांगत चीन ने या क्षेत्रात 10,000 वर्ग कि.मी. भारतीय भू– भागावर आपला दावा प्रस्तूत केला. शेवटी ऑक्टोबर 1962 मध्ये झालेल्या भारत–चीन युध्दात केवळ चीन–अक्साई चीनच्या जवळ जवळ 53000 वर्ग कि.मी क्षेत्रावर आपला अधिकार प्राप्त करण्यात सफल झाला. परंतू भारताचे पंचशील, विंश्वशांती व सुरक्षा संबंधी आदर्शवादी धोरण राष्ट्रीय अखंडतेला सुरक्षित ठेवण्यात अपयशी राहिलेत. या युध्दानंतर चीन–पाक सीमा समझोता (2 मार्च 1963) च्या आधारावर पाककडून अधिकृत काश्मिरच्या काराकोरम क्षेत्राचा 5180 वर्ग कि.मी. भू–भाग चीनला भेट दिल्याने या क्षेत्राची भू–सामारिक स्थिती अत्यंत जटिल झालेली आहे. भारत–चीन यांच्यातील तणाव–शैथिल्य आणि चीनची महत्वाकांक्षा–

सन् 1962 च्या युध्दात चीन कडून विविध राजनितीक,सामारिक,प्रबंधात्मक कारणांनी भारताच्या पराभवा नंतर आशिया व आफ्रिकेच्या सहा अलिप्तता देशांकडून प्रस्तूत 'कोलंबो–प्रस्ताव 'ज्यात चीन द्वारा पश्चिमी क्षेत्रातून आपली सेना काढून व याला असैन्यकृत प्रदेश घोषित करणे, पूर्वेत मॅकमोहन रेषेच्या समानानंतर (याग्ला शिखर व लांग्ज् प्रदेशाला सोडून ) आपली सेना तैनात करण्याचा प्रस्ताव होता, त्यास चीन ने अस्विकार केले. भारत–चीन यांच्यातील कटूतेने निर्माण झालेल्या परिस्थितीत अमेरिका व सोविएत संघाकडून प्रदर्शित सामारिक–राजनैतिक अभिरूची ने जेथे एकी कडे क्षेत्रिय शक्ती संरचनेत अदभूत परिवर्तन झाले तर दुसरीकडे बांग्लामुक्ती संघर्षात भारताचा शानदार विजय व 18 मे 1974 च्या पहिल्या भूमिगत आण्विक परिक्षणाने भारतात सुरक्षा–स्फुर्तीचे निर्माण होणे स्वाभाविक होते. 1961–1975 च्या काळात चीन ने जरी भारताच्या पूर्वोत्तर क्षेत्रात सक्रिया नागा व मिझो विद्रोही तसेच पं. बंगाल मधिल नक्सलवादींना समर्थन दिले तसेच 1976 मध्ये दोन्ही देशांमध्ये राजनीतिक संबंध पुन्हा बहाल झाले. तरी चीनी प्रमुख माओत्सेतुंगच्या मृत्यू नंतर देंबशियाओ पेंग च्या नेतृत्वात सुरू आर्थिक उदारिकरण, आधुनिकीकरण संस्कृतीक क्रांती नंतर भारत–चीन सबंधात निर्माण झालेली मैत्री भावना देखिल एक उत्प्रेरक ठरली. उल्लेखनिय आहे की, 1971 मध्ये भारताचे तत्कालीन विदेश मंत्री अटल बिहारी वाजपेयी यांनी चीन यात्रा व 1980 मध्ये चीनी नेता देंग शियाओ पेंग कडून प्रस्तावित 'पॅकेज समाधाना' च्या अंतर्गत दोन्ही देशांमध्ये चीनकडून 'मॅकमोहन सीमा' चे उल्लंघन करून सुमदोरोंग घाटित एक हेलीपॅड निर्माण करून घेतल्याने चीनच्या वास्तवीक भावनेची वृत्ती उघड झाली. चीनचे हे दु:सहासयुक्त  अभियान भारताकडून अरूणाचल प्रदेशाला एक पूर्ण राज्याला दर्जा देण्याची प्रतिक्रिया होती या क्षेत्रात आज ही भारत व चीन यांची सेना सडक व संचार प्रणालीच्या विस्तारासाठी कार्यरत आहेत.

सन् 1988 मध्ये राजीव गांधी यांनी चीन दौरा केला. त्याचे फलस्वरूप सीमा मुद्यासाठी संयुक्त कार्यकारी दल (JWG) चे गठन केले गेले. या संदर्भात चर्चांच्या तेरा फे–या पार पडल्यात तरी कोणताही परिणाम बाहेर आला नाही. वास्तविक नियत्रण रेषे (LAC) ला निर्धारित करण्यासाठी 1993 मध्ये जो समूह गठीत केला त्याचे कार्य देखील निराशा जनकच होते. 1996 मध्ये सीमेवरील संघर्षापासून वाचण्यासाठी (C.B.M) समझोता झालेला आहे. दोन्ही देशांचे राजदून, अधिकारी एक दुस–याच्या देशाचा दौरा करून चुकले आहेत. परंतू भारत–चीन सीमेवर चीन कडून सीमातिक्रमणाच्या घटना थांबतांना दिसत नाही. नुकताच चीनी अध्यक्षांचा ऑक्टोबर –2014 मध्ये भारत दौरा सुरू असतांना देखिल चीनची भारताची सीमेत घुसखोरी सुरूच होती. चीन ने सन 2000 मध्ये 96 वेळा तर 2007 मध्ये 140,2008 मध्ये270 वेळा अतिक्रमन केले हाते. 2009 मध्ये तर 1962 ची पुनरावृत्ती होते की काय अशी स्थिती निर्माण झाली होती. एवढेच नाही तर चीन ने नेपाळ ,बांग्लादेश, म्यानमार व श्रीलंका या देशांशी आर्थिक–सामाजिक संबंध दृढ करत भारताची सामरिक घेरावबंदीची योजना  तयार केली होती तसेच भारताला अंतर्गत अस्थिर करण्यासाठी सी.आय.एस.एस(Chaina International Institute for Strategic studies ) ने भारताचे 20 ते 30 तुकडे करण्याची योजना आखून सरकाला तसा प्रस्ताव दिला होता. या कामासाठी भारताचे सर्व शेजारी राष्ट्रांकडून सहकार्य घेण्याची इच्छा प्रकट केली होती. वास्तवीक चीन ची अशी इच्छा आहे की आसाम

मध्ये आसामी, तामिलनाडून तामिल व काश्मिर मधील काश्मिरी भारताच्या विरूध्द संघर्ष सोडून यांनी भारताचे तुकडे–तुकडे करायला पाहिजेत. उल्लेखनीय आहे की , पश्चिमी क्षेत्रात काराकोरम मार्गाचा निर्माण करून पाक अधिकृत काश्मिर मध्ये चीन ने आपली सामरिक स्थिती मजबूत तसेच सुदृढ करून एकीकडे अरबी समुद्र पर्यंत आपला मार्ग प्रशस्त करून घेतला पाहिजे तसेच पश्चिम व तिबेट–सीक्यॉग क्षेत्रात रस्त्यांचे जाळे पसरवून अनेक सैनिकी अड्डयांची निर्मिती निर्माण करून घेतली आहे. पाक अधिकृत काश्मिर मध्ये चीन ने प्रशिक्षण शिबिरापर्यंत सामरिक आधार बनवून घेतलेला आहे . एकाकडे भारता बरोबर चर्चाचे सोंग तर दुसरी कडे पाकिस्थानला आण्विक तंत्रज्ञान तसेच क्षेपणास्त्रांचा पुरवठा करायचा हा फारच मोठा विरोधाभास आहे. एवढेच नाही तर अंदमान निकोबार द्विप समूहापासून 40 कि.मी. दूर 'कोको द्विप' येथे चीनने आपल्या नौसेना सुविधांचा विस्तार केला आहे. श्रीलंकेत हम्बन टोटा बंदराचे निर्माण , बांग्लादेशाबरोबर सामरिक भागीदारी, तिबेट पासून नेपाळ पर्यंत रेल्वे मार्ग जोडून भारताच्या उत्तरसीमे पर्यंत आपल्या सेनेला पोहचने सुलभ करण्याच्या हालचाली ह्या सर्व चीनच्या भावी योजनेकडे इंगित करत आहोत. हिंदी महासागरात चीन व जपान यांच्या वाढत असलेल्या राजकीय व आर्थिक हालचाली तसेच कोरिया–चीन–पाक सामरिक त्रीकोण भारतीय राष्ट्रीय सुरक्षेसाठी गंभीर आव्हान आहे. याला प्रतिकार करण्यासाठी भारताला आपली 'लुक ईस्ट नीती' (Look East Policy) मध्ये संशोधन करून जपान व दक्षिण कोरिया बरोबर आर्थिक व सामारिक संबधांना ठोस आधार देवून सामरिक त्रिकोण विकसित केला पाहिजे. त्यातून आशियात शक्ति संतुलनाबाबत आपली योग्य भूमिका निभावली जाउु शकते. आम्हाला हे सुध्दा लक्षात घेतले पाहिजे की. दक्षिण कोरिया जगातली 13 वी आर्थिक महाशक्ति, 6 वी मोठी सैन्य शक्ति, 46 वा सर्वाधिक तेल आयातक देश,संशोधन विकासाच्या क्षेत्रात पाचव्या स्थानी आहे. भारत. द. कोरिया आंतरिक्ष उर्जा,व्यापार इ. क्षेत्रात सहकार्य वाढवून आशियात बॅलस्टीक क्षेपणास्त्रांच्या प्रसारावर बंदी आणण्यासाठी प्रयत्न करू शकतात. भारताने सागरात जे 'मिलन नौसन्य' अभ्यास केला त्याला सुध्दा चीनने आक्षेप घेतला आहे या सर्व गोष्टी फारच चिंता जनक आहेत.

***भारत–चीन संबंधाचे भविष्य–***

भारत–चीन ह्या 21 व्या शतकातील अशा दोन अर्थव्यवस्था आहेत, त्या जर सीमा–संघर्षात लिप्त राहिल्यात तर त्यामुळे जागतिक संतुलन देखिल प्रभावित करू शकतात.आफ्रिकी बाजारावर नियंत्रण करण्यासाठी दोघंमध्ये स्पर्धा सुरु आहे. एकीकडे चीन ने आफ्रिकी देशांना 456 अब्ज रूपयांचे कर्ज देवून आपले वर्चस्व निर्माण केले आहे. भारत तेथिल बाजारात फर्मास्युटिकल ,तंत्रज्ञान ,औद्योगिक साहित्य निर्यात करून तेथून तांबे, कोबाल्ट, हिरे, सोने व तेलाच्या आयाती साठी प्रयत्नशील आहे. अफबान मध्ये भारताचा व्यापार परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत चीन पूर्णपणे जागृत व सतर्क आहे.

भारत–चीन यांच्यात सीमा विवाद असून देखील देशोमध्ये अनेकवेळा वार्ता होत राहतात. त्याच बरोबर एकमेकांबरोबर आर्थिक,व्यापारिक व तांत्रिक, शैक्षणिक व उद्योग क्षेत्रातील संबंध विस्तारण्याचा प्रयत्न सुरू आहे. तरी दुसरी कडे चीन मात्र भारतात सायबर घुसखोरी ,फिंगर टिप, विवाद, त्वांग समस्या, मॅकमोहन रेषेची वैधानिकता ,नेपाळला चीन ची भारत विरोधी मदत, भारताच्या पूर्वोत्तर मधिल जवळीकता, काश्मिर संबंधी स्पेटल व्हिसा विवाद' यातल्या अनेक मुद्यांवर चीनची आक्रमकता व दुराग्रहपूर्ण दृष्टिकोण भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा व अखंडत्वापुढील मोठे आव्हान आहे.

आज भारतातील दलगत राजकारणामुळे भारताची जागतिक स्तरावरील स्थिती एक 'नरतम राज्याची' बनलेली आहे. भारत आपल्या क्षेत्रीय हितांना सुरक्षित ठेवण्याच्या बाबतीत असहाय दिसून येत आहे. त्यामुळेच जागतिक स्तरांवर भारत आपले योगदान देखिल देवू शकत नाही. भारताचे जागतिक स्तरावर जे आज स्थान आहे त्याला चीनची नीती देखिल उत्प्रेरक आहे. त्याच्या प्रतिवादासाठी भारताला तत्काळ परिपक्क, दूरदर्शी व प्रभावी राजनितीक पुढाकाराची गरज आहे. आणि त्या दिशेने लोकसभेत पूर्ण बहुमताचा कौल मिळालेले नरेंद्र मोदी सरकारने आपली पाउुले उचलेली आहेत.

***संदर्भ–***

1.Chung Tan; China report, march-April – 1979 p.4
2. Lbid.
3.S.S. Singh; China & South Asia, Lanc Books Now Delhi, P.-26.
4.Bhawn Pokhorna; India China Relatons. New Delhi, P.8-9.
5.C.P. Fizeralal, The Chines view of their place in the world, offord press-1964.
6.V.B. Kartik, China Invaders, India New Delhi-P120.\

7.C.V.Raghunathan,Vinod Khanna, India-Chaina Relation,The way Ahead, New Delhi-P-16.
8. Purushotam Mehra, India-China & Tibet, Deep of Deepm New Delhi, 1992 P.468.
9.Bhavan Pokharna , No. 4, P-136
10.Karuna Karan, K.P. India In world Affairs 1947-50
11.Jl. Nehru, Inside America-P-220.
12.Times of India 7th Junaury 1950.
13."The Murder of the actual Independence of Tibet " Organiser, 24 may 1954
14.J.Bandyopadhaya; The making of India's foreign policy p.305
15.Mathai M.O.;Reminicence of Nehru Age, Vikas ,New Delhi 1970 P.168.
16.Lbid.
17.J.Bamchyopadhya; The making of Indias foreign policy p.308
18.K.Gopal Chari, India –China Boundry'



*एन.झेड्. पाटील*
विभाग प्रमुख व रिसर्च गाईड , के. एन. बी .आर्टस कॉलेज नवलनगर ता.जि.धुळे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org